# टॅक्स फ्री एकांकिका आणि कदाचित चित्रपट

रविवार १ जून २००७ रोजी महाराष्ट्र मंडळ न्यूयॉर्कने एक आगळीवेगळी एकांकिका आणि अप्रतिम मराठी चित्रपट सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

दिलीप शेटये यांनी कार्यक्रमाची सुरूवात केली. मंडळाच्या जुन्या सभासद सौ. छाया दिघे यांचे ११ मे २००८ रोजी दुःखद निधन झाल्याबद्दल त्यांना श्रध्दांजली अर्पण केली आणि मग मंडळाच्या कार्यक्रमाला सुरूवात झाली. दिलीप शेटये यांनी कार्यक्रमाची रूपरेषा थोडक्यात निवेदन केली आणि कार्यक्रम सुरू झाला.

टॅक्स फ्री ही रहस्यमय विनोदी एकांकिका पाहताना तर क्षणोक्षणी आता काय घडणार या विचाराने मन अधीर व्हायचे आणि त्यानंतर घडणाऱ्या विनोदी घटनेने मन आनंदीत व्हायचे. अंध व्यक्तींची विचारशक्ती कोणत्या पध्दतीने विचार करू शकते आणि किती विनोद निर्माण करू शकते याचे ही एकांकिका एक छान उदाहरण आहे. डॉ. मीना नेरूरकरंरनी उत्कृष्ट दिग्दर्श न केले आहे. तसेच कलाकार अनिल सांगोडकर, शेखर अराणके, विनय देसाई आणि रवि बोडस यांचा अभिनयही अतिशय उत्कृष्ट होता.

मध्यंतरात सर्व मंडळींनी चहा, कॉफी आणि थोडया फराळाचा आस्वाद घेतला आणि त्यानंतर चित्रपट पाहण्यासाठी सभागृहात जमले. सौ. निलीमा फाटक यांनी प्रक्षकांचे पुन्हा स्वागत केले आणि कदाचित या चित्रपटाची ओळख करून दिली.

कदाचित या चित्रपटानेतर सर्व प्रेक्षंकांची मने जिंकून घेतली. "खूप दिवसांनी असा उत्तम चित्रपट पहायला मिळाला" असे उदगार बऱ्याच मंडळींनी काढले. अश्विनी भावे आणि सचिन खेडेकर यांना या चित्रपटाबद्दल वी. शांताराम पुरस्कार मिळाला आहे, तो सार्थच आहे. शिवाय सदाशिव अमरापुरकर आणि तुषार दळवी यांचा अभिनयही मनाला स्पर्शून गेला. मुळात चित्रपटाची कथाच चांगली होती आणि त्यावर कलाकारांनी कळस चढवला. त्यामुळे प्रेक्षकांना एक उत्कृष्ट कलाकृती पहायला मिळाली.

- अरूंधती किन्नरे